कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
## Department of Lifelong Learning and Extension (DLLE)

**ऑनलाईन प्रमाणपत्र शिक्षणक्रम**

# कवयित्री बहिणाबाई चौधरी : जीवन आणि काव्य

## माहितीपत्रक




**Contact Details**

Department of Lifelong Learning and Extension (DLLE)
Dr.A.P.J. Abdul Kalam Vidyarthi Bhavan,
1st Floor,Near Rikshaw Stop
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,
Jalgaon (MS)

**Web-page :** https://nmu.ac.in/external-education
(click on certificate programme)

**E-mail:** ideal@nmu.ac.in

**Facebook ID :** DEEL,Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon.

**Contact:** 0257-2257495/2258496

# कवयित्री बहिणाबाई चौधरी : परिचय









महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध मराठी कवयित्री ज्यांच्याजवळ जिवंत काव्यरचनेची निसर्गदत्त प्रतिभा होती असे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्व म्हणजे बहिणाबाई चौधरी. माहेर, संसार शेतीची साधने, कापणी, मळणी इ. जीवनातील विविध प्रसंग अक्षय्य तृतीया, पोळा, पाडवा, सणसोहळे असे त्यांच्या कवितांचे विषय.

बहिणाबाईच्या कवितांतून आपल्याला निसर्ग, नात्या-नात्यांतील परस्परसंबंध, स्त्रीविषयक दृष्टिकोन,उपदेशाचे देशी बोल, सहजसुंदर विनोदाची खोली जाणवते. त्यांच्या कवितांतून गद्य वाक्प्रयोग, बोली भाषेची नाना सुंदर वळणे, बोलीभाषेतील शब्दांचा अचूक वापर आणि सरलता यांचा संगम जाणवतो.

अशिक्षित असुनही जीवनाचे मर्म त्यांच्या प्रत्येक कवितेतून क्षणोक्षणी आपणास अनुभवयास मिळते. बहिणाबाईंच्या कविता वऱ्हाडी-खानदेशीत, त्यांच्या मातृबोलीत, रचिलेल्या आहेत. बहिणाबाईच्या कवितेतून लेवा पाटीदार बोलीचे दर्शन घडते.काही ठिकाणी अहिराणी व प्रमाण मराठी भाषेचा प्रभाव जाणवतो.

घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी कवितेच्या प्रांगणात अजरामर ठरले. मराठी साहित्यात दर्जेदार साहित्यनिर्मिती करणाऱ्या बहिणाबाई चौधरी अशिक्षित असूनही कवितेरूपी अष्टपैलू साहित्य त्यांनी निर्माण केले त्याला खरोखरच तोड नाही.











# शिक्षणक्रमाचा उद्देश



- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्यात आले आणि त्यांच्या नावाने अध्यासन विद्यापीठाच्या प्रांगणात आहे हि ऐतिहासिक नोंद अजरामर राहावी.



- विद्यापीठाशी संबंधित विविध महाविद्यालयात शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी, शिक्षक,पालक आणि समाज यांच्यापर्यंत बहिणाबाईंच्या काव्याची जागतिक स्तरापर्यंत पोहोचलेले नावलौकिक याची महती समजावी.

- कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे मराठी साहित्यातील भरीव योगदान समाजातील सर्व स्तरातील तळागाळापर्यंतच्या घटकांना जवळून परिचय व्हावा.



# महत्व

वर्तमान काळात लोकांची जीवनशैली बदलत चालली आहे. माणूस समाजात वावरत असूनही एकाकी होत चालला आहे.सगळ्यांना सोबत घेऊन पुढे न जाता एकट्याचेच हित साधण्याची वृत्ती वाढीस लागली आहे. आयुष्य जगत असतांना आपण कसं जगायला हवे ह्याचे महत्व पटवून सांगून प्रत्येक मानवाने मानवासारखी माणुसकी कशी जपावी याचा अनुभव देण्यासाठी हा शिक्षणक्रम अत्यंत महत्वाचा आणि उपयुक्त ठरणार आहे.





















## वैशिष्ट्ये

- घरी बसून ऑनलाईन पद्धतीने बहिणाबाई यांचे जीवन आणि काव्याचा परिचय होईल.
- फक्त तीस (30) तासांचा
- शुक्रवार आणि शनिवार दोन-दोन तास ऑनलाईन वर्ग सुविधा
- तज्ज्ञ आणि अनुभवी प्राध्यापकांद्वारे मार्गदर्शन.
- शिक्षणक्रमअंतर्गत कार्य यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यापीठाकडून अधिकृत प्रमाणपत्र मिळणार.

## फायदे

- कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा जीवन परिचय होईल.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यरचनेचे स्वरूप आपणास स्पष्ट होईल.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यरचनेच्या वैशिष्ट्यांची ओळख होईल.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचे योगदान सामाजिक जीवनात किती महत्वपूर्ण आहे याबाबत आपणास माहिती मिळेल.











# शिक्षणक्रम स्वरूप



| | |
|---|---|
| लक्ष्य गट (Target Group | 18 वर्षांपुढील कोणीही प्रवेशास पात्र |
| प्रवेश क्षमता (Intake Capacity) | 50 पर्यंत |
| प्रवेश पात्रता (Eligibility Criteria) | किमान 12 वी पास |
| श्रेयांक(Credit) | 02 |
| एकूण तास (Total Hours) | 30 |
| ऑनलाईन सत्रे (Online Sessions) | शुक्रवार आणि शनिवार दोन-दोन तास प्रति दिवस |
| शुल्क (Fees) | 500/- |
| प्रात्यक्षिक कार्य (Practicle Work) | पोस्टर्स,व्हिडीओ,हस्तपुस्तिका आणि क्षेत्रभेट अहवाल- 30 गुण |
| लेखी परीक्षा (Written Exam) | बहुपर्यायी -20 गुण |
| परीक्षा गुण (Total marks for Exam) | 50 (20 + 30) |







डॉ.मनिषा व्ही.जगताप
सहा.प्राध्यापक आणि
शिक्षणक्रम समन्वयक,आजीवन विभाग

प्रा.डॉ.आशुतोष आर.पाटील
संचालक,
आजीवन विभाग

**शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी आजीवन विभागातर्फे हार्दिक शुभेच्छा**









